# शकुन गे माये, सांगताहे

उज्जैनला कालिदास महोत्सवासाठी देशभरचे विद्वान आलेले होते. मुख्य कार्यक्रमासाठी जायला म्हणून आम्ही बाहेर पडलो तेव्हा एकाने म्हटले, ''चांगला शकुन झाला. आता कार्यक्रम चांगला होणार.'' समोरून एक सुवासिनी पाण्याचा भरलेला घट घेऊन येत होती. या उद्गारांवरून शकुन-अपशकुनाबद्दल बरीच चर्चा झाली. भरलेला घट समोरून येणे हे चांगले समजले जाते; तसेच रिकामा घट घेऊन कोणी आपल्या मागून पुढे गेले तरी चांगला शकुन समजतात. हे परस्परविरुद्ध असतानाही चांगले का, असा प्रश्न विचारला गेला. संस्कृतचा आणि आपल्या परंपरांचाही दांडगा व्यासंग असलेले एक स्वामीजी आमच्यासोबत होते. त्यांनी खुलासा केला. पांथस्थाला पाण्याचे फार महत्त्व असते. समोरून भरलेला घट आला किंवा पाठीमागून रिकामा घट आला तर त्याचा अर्थ असा की आपण जात आहोत त्या दिशेला पाण्याचा साठा आहे. म्हणजे आपला त्या दिशेला जाण्याचा निर्णय चांगला आहे.

मग समोरून अंत्ययात्रा आली तरी चांगला शकुन कसा, हा प्रश्न आल्यावर स्वामीजी हसले आणि म्हणाले, ''समोरून अंत्ययात्रा आली त्याचा अर्थ जे वाईट तिकडे घडणार होते, ते घडून गेले आहे. आता चांगले घडणार आहे. तेव्हा तिकडे जायला हरकत नाही.''

मुहूर्त, शकुन, अपशकुन या साऱ्या संकल्पनांनी आपण पावलाव्हच्या कुत्र्यासारखे आपल्या मनावर संस्कार करून टाकत असतो. योगायोग हा दरवेळी सारखाच असतो असं नाही. पण आपल्याला तसं वाटत राहतं. पेशव्यांच्या स्वारीच्या वेळी पाण्याचे भरलेले घडे घेऊन, सुवासिनी समोर येतील अशी व्यवस्था केली जाई. असे योजनापूर्वक घडवून आणलेले शकुन कितपत उपयोगी पडत असतील ? शिवाजी महाराजांनी तोरणा किल्ला जिंकून स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली त्या दिवशी अमावास्या होती. तो मुहूर्त चांगला नाही म्हणून ते वाट पाहात बसले असते तर स्वराज्याचं काय झालं असतं ? तो सगळा कालखंडच अंधाराचा होता. कित्येक शतकं चालणारी अमावास्या आणि तिचा अंधार यांनी इथलं जनजीवनच व्यापून टाकलं होतं. (थोडक्यात, आता आहे तीच परिस्थिती होती.)

तो अंधार हटवायला आयुष्याची ज्योत पेटवायची होती शिवाजी महाराजांना. त्याला मुहूर्त कुठे लागतो ? अपशकुन झाला. मुहूर्त चांगला नसला तर त्याचा अर्थ एवढाच घ्यायचा की आता आपल्या प्रयत्नांचा दर्जा उंचावायला हवा. अपशकुनांना घाबरून चांगल्या शकुनांची वाट पाहात राहिलो तर चांगले शकुन होणारच आहेत केव्हा ना केव्हा. पण वाट पाहण्यातच आपलं कितीतरी आयुष्य संपून जाणार आहे. का तसं होऊ द्यायचं ?

---

**– भीष्मराज बाम**

**('मना सज्जना' या पुस्तकातून)**